प्रोबेट अर्ज क्र. २/२०२४
निशाणी १४ /सी सोबत

अर्जदारतर्फे साक्षीदार क्र.५ यांची साक्ष शपथेवर सुरु -

नाव - नानासाहेब जर्नादिन पाटील
वय – ५७ वर्ष
व्यवसाय - वकीली व नोटरी
रा. कुरुंदवाड, जि. कोल्हापूर.

**<u>सरतपास अर्जदारतर्फे विधीज्ञ टी. बी. पाटील यांचेमार्फत सुरु</u>**

१. मला न्यायालयाचे साक्षीसमन्स मिळाले होते ते मी आज आणले आहे. समन्समध्ये नमुद केल्याप्रमाणे मी मुळ नोटरी रजिस्टर व मुळ पावती पुस्तक सोबत आणले आहे. मला आता निशाणी ३ चे यादी सोबत अ.क्र.१ सोबत असलेला नोटरी केलेला मुळ मृत्युपत्राचा दस्त दाखवण्यात आला. सदर मृत्युपत्र माझ्याकडे नोटरी करण्यात आलेले आहे. त्यावर नोटरी केल्याबाबत माझी सही व शिक्का आहे. मुळ नोटरी रजिस्टर पाहुण सांगतो की सदर दस्त अ.क्र.५ येथे दि.०१.०१.२०२३ रोजी नोंदवलेला आहे. मुळ रजिस्टरमध्ये मृत्युपत्राचा दस्त नोटरी करणारे म्हणुन बाबु उर्फ कासिम म्हामुलाल चाऊस यांची सही तसेच छायाचीत्र व निशाणी अंगठा आहे. तसेच साक्षीदार यांच्या सहया व फोटो लावून निशाणी अंगठे घेतले आहेत. सदर बाबु उर्फ कासिम म्हामुलाल चाऊस यांनी माझ्या समक्ष मृत्युपत्रावर सहया केल्या आहेत. प्रत्येक पानांवर माझी देखील सही आहे.

(मध्यांतर झाल्यामुळे साक्षीदाराचा उलटतपास तहकुब)

श्रवणोत्तर स्विकृत,

(अ. बा. कुरणे)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
जयसिंगपूर.

दिनांक : ३०.०७.२०२६.

**<u>मध्यांतरानंतर अर्जदारतर्फे साक्षीदार क्र.५ यांची  साक्ष शपथेवर सुरु</u>**
**<u>उर्वरीत सरतपास अर्जदारतर्फे विधीज्ञ टी. बी. पाटील यांचेमार्फत सुरु</u>**

२.	नोटरी रजिस्टरमध्ये सदर मृत्युपत्राची जी नोंद करण्यात आली त्या नोंदीची नक्कल मी आज रोजी सोबत आणली आहे. सदर प्रत सत्यप्रत आहे त्यास **<u>निशाणी १५</u>** देण्यात येते. सदर मृत्युपत्राचे नोटरीबाबत मुळ पावती पुस्तकातील पावतीची सत्यप्रत मी आज रोजी सोबत आणली आहे. सदर प्रत सत्यप्रत आहे त्यास **<u>निशाणी १६</u>** देण्यात येते.

**<u>सरतपास पुर्ण</u>.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by KURANE ANITA BALASAHEB
Date: 2026.07.30 17:41:42 +0530

(अ. बा. कुरणे)

दिनांक : ३०.०७.२०२६.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
जयसिंगपूर.